# खंडेलवाल महाविद्यालयात 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा'!

देशोन्नती 1.8.25



**अकोला :** जुने शहरातील शंकरराव खंडेलवाल महाविद्यालय तसेच विवेकानंद कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिटयूट यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच क्वीक हिल' कंपनीच्या सहकार्याने 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा' हा जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला

या उपक्रमांमार्फत विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यात सायबर गुन्हे आणि ऑनलाइन धोके याविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली

विध्यार्थ्यांनाऑनलाईन जॉब फ्रॉड्स अर्थात फसवणूक, सायबर बुलिंग -ऑनलाईन छळ, फोटो मॉर्फिंग व ब्लॅकमेलिंग, डीपफेक व्हिडीओ आणि फेक फोटो, डिजिटल अरेस्ट - बनावट पोलिस, सीबीआय अधिकारी बनून फसवणूक, 'एआय'चा गैरवापर - बनावट कॉल्स, मेसेजेस, आवाज आणि चेहऱ्याचा वापर, वैयक्तिक माहितीची चोरी आणि गैरवापर आणि असेच अनेक प्रकारचे सायबर गुन्हे सायबर सुरक्षेसाठी काही महत्त्वाचे टीप्स देखील सांगण्यात आल्या. अनोळखी लिंक किंवा ॲप्सवर क्लिक करू नका, सोशल मिडियावर वैयक्तिक माहिती मोकळेपणाने शेअर करू नका, दोन-स्तरीय सुरक्षा वापरा, कोणत्याही अनोळखी कॉल, मागण्या टाळा, आपल्या मोबाईल, सोशल अकाउंट्सवर वेळोवेळी पासवर्ड बदला आदींबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. सदर मार्गदर्शनासाठी स्वयंसेवक ओम गुजर, आदित्य गोतमारे तसेच संस्थेचे प्राचार्य अमोल येळणे, प्रिया येळणे यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाला शरयु शिंदे, तसेच विध्यार्थी उपस्थित होते.